## प्रकरण ६

## लक्षणें - रूप - निरूपण

उदराच्या लक्षणसमूहाचा विचार करूं. तद्वैव व्यक्ततां यातं रूपमित्यभिधीयते, उदराची संप्राप्ती घडून व्याधीचा स्थानसंश्रय झाल्यावर उदर विकाराचा लक्षणसमूह व्यक्त होतो.

शरीराला काय पाहिजे काय नको, कोठल्या भागांत विकृति झालेली आहे हे स्पष्ट करणारी लक्षणे असतात. त्याचा बोध नीट झाला नाहीं, ती नीटपणे लक्षांत घेतली नाहींत तर विकृतीचा बोध होत नाहीं. यासाठी रुग्णाची लक्षणे संपूर्णतः जाणून घेणे आवश्यक आहे. इतकेंच नव्हें तर लक्षणसमूहातील प्रत्येक लक्षणाला त्याचे वैशिष्ट-पूर्ण असे खास महत्व असते. त्यांतील एक जरी लक्षण गाळले, विचार करण्याचें टाळले तरी विकृति पूर्णांशाने कळणार नाही आणि त्या - शिवाय चिकित्सेची अचूक सूत्रे ठरविता येणार नाहींत.

लक्षणे ही संप्राप्तिजन्य :- संप्राप्ति सापेक्ष व संप्राप्तिबोधक असतात. त्यामुळे लक्षणांचा विचार करूनच शरीरांतील संप्राप्ति दोषांचा विकृत ~~व~~ व्यापार जाणून घेता येतो. विकृति ही संप्राप्तिसापेक्षा घडत असल्यामुळें विकृति बदलतांच लक्षण समुच्चय बदलतो. म्हणुनच विशिष्ट विकृतीचे विशिष्ट लक्षणसमुच्चय निर्माण होतात. विकृतीचे निर्मितीला सुरवात होताच लक्षणें विकृतीच्या क्रमाने निर्माण होतात जी लक्षणे आगोदर निर्माण झाली. त्यांनी निदर्शित विकृती प्रथम निर्माण झाली म्हणून समजावे. ज्या क्रमाने विकृति त्याच प्रक्रमाने

लक्षणांची निर्मिती निर्माण होत जाते. त्यामुळे लक्षणें कोणत्या क्रमाने निर्माण झाली हा क्रमदेखील जाणून घेणे आवश्यक असते. तो क्रम जाणून घेतला नाही, कोणत्या स्त्रोतसांची दृष्टी प्रथम झाली हे जर कळले नाही, तर चिकित्साक्रमातही उलटापालट होईल व संप्राप्तिभंग म्हणजे चिकित्सा, याला डावलून गेल्याप्रमाणे होईल. संप्राप्ति विनिश्चय जर करतां आला तर रोगविनिश्चय करता येतो व तो करण्याचे एकमेव साधन म्हणजे रूप वा लक्षणे होत.

उदरव्याधीमध्ये उदराची व्यवच्छेद लक्षणे म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल, तो लक्षणसमूह खालीलप्रमाणे :-

उदरवृध्दि -- आध्मान - गमने शक्ति, दौर्बल्य, श्वसिती
अल्पे ऽ पि चेष्टिते, अग्निमांद्य आणि आणि शोथ

उदरवृध्दि — हे उदररोगाचे भेदसूचक लक्षण आहे. ते दीर्घकालानुबंधाने रहाते. ते नष्ट झालें की उदर रोगाचा प्रशम झाला असे मानले जाते. उदर वृध्दि ही प्राय: सर्व उदराला व्यापून होत असते. कफप्रधान सन्निपातोदरांत सामकफामुळे स्त्रोतोरोध झाल्यास ही एकदेशीय आढळते. व स्त्रोतोरोधामुळे उदरवृध्दि होते व उदरांत स्वेदवह व अंबुवह स्त्रोतसांचा रोध होतो व रोध म्हणजेच संग होय. संग पावलेलें उदक विमार्गगमनाने उदरांत साठू लागते व उदरवृध्दिस प्रारंभ होतो [ अल्पउदक असलेले तेंव्हा त्यास अजातोदक म्हणतात. त्याचे प्रमाण लक्षणानें समजू लागले की त्याला जातोदक म्हणतात. एकानंतरची दुसरी अवस्था आहे. तेंव्हा उदरवृध्दि ही स्रोतोरोध निदर्शक घटना होय.

आध्मान - पोट फुगणे " वातसंचय झाल्यामुळे आध्मान निर्माण होतो. वर ताडण केलें असतां आवाज येतो. अग्निमांद्यामुळे वातसंचय होतो आणि

अपानाचा अवरोध झाल्याने तो निघून जाण्याऐवजी कोटात साचून राहातो. अग्निमांद्य व अपानाची प्रतिलोमता याचे हे लक्षण होय.

आध्मान व पुरीषसंग - रुग्णालयामध्ये प्रविष्ट प्रतिशत ७२ उदरी रुग्णांत पुरीषसंग हे पूर्व रूपांतील लक्षण रूपावस्थेत अधिक व्यक्त झालेले दिसून आले.

दोषातिमात्रोपचयात स्रोतोमार्ग निरोधनात सम्भवन्त्युदराणि पुरीष - संगाने दोषाची अतिसंचिती झाल्याने उदरी रुग्णाला विरेचन देण्याची आवश्यकता पडते.

जलोदराच्या उत्पत्तीपूर्वी रुग्णांमध्ये अतिसाराचा इतिहास मिळाला परंतु त्यानंतर उदर निर्मिती होईपर्यंत विबंध - पुरीष - संगाची बहुतांशी रुग्णात लक्षणे दिसून आली.

अग्निमांद्य - हे उदर रोगाचे अव्यभिचारी लक्षण आहे. [ रोगा : सर्वेऽपि मंदेऽग्नौ ] या ठिकाणी कारणभूत अग्निमांद्य पुढे चयादि अवस्थांतून तसेच लक्षणांतही प्रकट होते. हे कफगुणाच्या वृध्दीचे [ मंद ] व जाठराग्निमांद्यसूचक लक्षण होय [ क्लेदक कफ ] समानदृष्टी व पाचकाग्नि दुष्टीही येथे अभिप्रेत आहे.

प्रतिशत ८५ रुग्णांमध्ये हे लक्षण दिसून आले

दौर्बल्य बलक्षय -- [ आयुर्वेदांत बल ओजाला म्हंटलेले आहे ] तत्र रसादीनां शुक्रांतानां धातूंना उत्पर तेजस्तत खल्वोजस्तदेव बलमित्यच्यते उदरी रुग्णांमध्ये रक्तादि धातूंचा क्षय असतो [ त्यामुळे धातुक्षयाची लक्षणे या व्याधीमध्ये असणे शक्य आहे. तत्र बलेन स्थिरोपचितमांसती सर्वचेष्टास्वप्रतिघात: स्वरवर्णप्रसाद: बाहयांना अभ्यंतराणां च करणांना आत्मकार्यप्रतिपत्तिर्भवति । सु. सू. १५

पर्वभेद व संधिपीडा — जलोदराच्या प्रतिशत १० रुग्णांमध्ये ही लक्षणे दिसून आली. अधिकांश आमवाताप्रमाणे वरील लक्षणे होती. तर उदरांत अल्पांशाने संधिवाताप्रमाणे ही लक्षणे आढळून आली.

हत्स्पंद -- प्रतिशत ८ रुग्णांत हे लक्षण दिसून आले. प्राय: दुर्बल व हाड्रोजन उदरांत वरील लक्षण आढळून आले.

कार्श्य - - अग्निमांद्यजन्य अपतर्पण व धातुक्षयाचे विशेषत: मांसधातु क्षयाचे हे लक्षण आहे. जलोदरांत शोथ असतां कार्श्याचे अनुमान करतां येणार नाहीं, परंतु शोथ कमी झाल्यावर व जलनिर्हरण केल्यावर कार्श्य दृष्टोत्पत्तीस येतें.

प्रेतरूपावभासता - - निस्तेज किंवा असाध्यतेप्रत गेलेला असे २ अर्थ आहेत. उदर व्याधींत उत्तरोत्तर धातु बनत नसल्यामुळे बलवर्ण याची हानी होऊन उदरी रुग्णावर सजीव प्रेतवत कळा आलेली असते. तसेच उदरामध्ये ओजक्षय व ग्लानि ही लक्षणे दृष्टोत्पत्तीस येतात. उदरी रुग्णाच्या चेहऱ्यावर दैन्य दिसून येते. बहुतेक सर्व रुग्णांत हे लक्षण दिसून येते.

पाण्डुता - - हे लक्षण प्रतिशत ५२ रुग्णांत पहावयास मिळाले. नख, नेत्र, त्वक यांचे ठिकाणी सदर रुग्णांवर पाण्डुत्व स्पष्ट दिसुन आले.

शोथ - - हे स्रोतारोध या संज्ञेने रस-प्रदोषज व जाठराग्निमांद्यसुचक लक्षण होय. उदराच्या संप्राप्तिंत उदकवह स्त्रोतसाची दृष्टी वर्णिली आहे. असा शोफ हस्त व पादभागीं, व क्वचित वृषणभागी येतो. मुखभागीं येणारा शोफ श्लक्ष्णगंडत्व, या पदाने सूचित केला आहे. हा भाग पांडुवर्णी व तुकतुकीत दिसतो. कित्येक वेळा पाण्डुचा उपद्रव म्हणून अशा तऱ्हेचा शोथ येतो. प्रतिशत ५९ रुग्णांमध्ये शोथ आढळून आला.

डॉ. घाणेकरांनी ओज आणि बल यामध्ये भेद प्रदर्शित केला आहे. ओज हे कारण व बल हे कार्य आहे आणि बलाची सर्वाधिक उत्पत्ती ओजामुळेच होते असे त्यांचे मत आहे.

त्या बल वा ओजाने, शरीराच्या सप्त धातूंची स्थिरता, पुष्टि होते. तसेच सर्व प्रकारची कार्ये करण्याची क्षमता उत्पन्न होते. स्वर व वर्णाची प्रसन्नता तसेच बाह्य व अभ्यंतर इंद्रियांना आपापले कार्य करण्याची शक्ति लाभते.

ओज २ प्रकारचे आहे. १ पर व दुसरे अपर. पर ओजाचे आश्रयस्थान हृदय आहे. ते अष्टबिंद्वात्मक असते. ते कमी झाल्यास शरीराचा नाश होतो. अपर ओज सर्व शरीरांत फिरते. त्याचे अर्ध अंजली प्रमाण आहे. मधुमेह तथा वृक्क विकारांत अपर ओज मूत्राद्वारा शरीरांतून बाहेर जाते.

एतेन द्विविध ओजो दर्शयति परं अपरं च
तत्रांजलिपरिमाणं अपरं अल्पप्रमाणं तु परम ...
प्रमेहे धांजलिपरिमते ओजः क्षीयते नाष्टबिंदुकम् [अ.सं.]

आधुनिक विद्वानांमध्ये ओजाला व्हिटॅमिन्स, कांही अल्ब्यूमिन, कांही ग्लायकोजन, कांही प्रोस्टेट, ग्रंथींचा स्त्राव, कांही टेस्टीज आणि ओव्हरीजचा अंतःस्त्राव म्हणतात. परंतु डॉ. द्वारकानाथनी ओजाला शरीराची रोगक्षमता [ Natural Resistance ] संबंधित द्रव्य मानलं आहे. त्यामध्ये प्रॉपरडीन [ Propredine ] प्रमुख आहे.

उदर रोगप्रसंगाने अॅल्ब्युमिनला अपर ओजसमान मानले आहे. हे अॅल्ब्युमिन रक्तांत कमी असलेकी जलोदर होते असे पाश्चात्यांचेही मत आहे.

जलोदरातील अधिकांश रुग्णांमध्ये प्लाज्यामध्ये अॅलब्युमिन कमी दिसून येते. जलोदराच्या ज्या रुग्णांना वृक्क विकार होता त्यांच्या मुत्रातून अॅलब्युमिन बाहेर जात असे. रक्त औषधु सपितकम । वर्ण रक्ताच्या सीरम प्लाज्म्याचा वर्ण आहे. त्यामध्ये अॅलब्युमिन ग्लोब्युलिन सर्व असतात ओज-क्षय ३ प्रकारचा आहे १] विस्त्रंस. २] व्यापत्, व ३] क्षय, विस्त्रंस अविस्थेत संधिशैथिल्य, अंगसाद व वातादि दोष स्थानभ्रष्ट होतात. शारीरीक, मानसिक तथा वाचिक क्रिया योग्य त-हेने होत नाहीत.

व्यापत अवस्थेत शरीरात स्तब्धता, वातिक शोथ, वर्णपरिवर्तन ग्लानि, तंद्रानिद्रादि लक्षणे होतात.

क्षयामध्यें मूर्च्छा, रसादि धातूंचा क्षय, मोहन, प्रलाप, व मृत्यू होतो.

दौबल्य हे लक्षण आमाचे सूचक आहे. रसरक्तादि धातु मोठया प्रमाणात कमी होऊन दौर्बल्य येते. किंवा सामतेने दोषसंचित होऊन दोष दुर्बलता येते. जलोदराच्या रुग्णाला कुशीवर वळण्याइतकेही बल नसते. अशा त-हेने दौर्बल्यसापेक्ष असणार. प्रतिशत ७० रुग्णांमध्ये दौर्बल्य हे लक्षण दिसून आले.

गमने शक्ति -- न चालवणे -- हालचाल करण्यास पूर्वीप्रमाणे शक्ति नसणे, अग्निमांद्यामुळे उत्तरोत्तर धातु बनत नाहीत. त्यामुळे हालचाल करणे शक्य होत नाही. तसेच वरील लक्षण प्राणक्षयाचे आहे. प्राण हा हृदये पदृय चित्तधृक् आहे. गमन कर्म हे पादौ गमनकर्मणि या दृष्टीने कार्मेंद्रिय हानिसूचक आहे.

अंगसाद -- नष्ट चेष्टा - बला - गात्रावसाद, हातपाय गळून जाणे, मनुष्याची काम करण्याची शक्ति कमी होणे हे लक्षण अग्निमांद्याने

झालेल्या परिणामी अपतवर्णाचे व अल्पप्रमाणतेचे आहे.

तंद्रा :- हे लक्षण बरेच उशीरा व विशेषत: जलोदरांत निर्माण होते. रोगी अर्धवट बेशुध्दावस्थेत असतो. तंद्रा हे लक्षण दोषविकृति इंद्रिय-स्थानापर्यंत पोहोचली याचे निदर्शक आहे. म्हणूनच ते कष्टसाध्यता सुचविते.

कास :- हे लक्षण शे. २४ रुग्णांत, वातज व कफज उदरांत वैशिष्ट्याने कास लक्षण आढळून आले. हृद्रोगजन्य व उदरांत हे लक्षण पहावयास मिळाले क्षयजन्य उदरांत क्षतज व क्षयज कास विशेषत्वाने आढळून आला.

अल्पे पि व्यायामे श्वास :- श्वास घेणे म्हणजे विश्वास हे प्राण वायूच्या कक्षेतील लक्षण आहे. प्राणवह स्त्रोतसांत प्राणवायूमध्ये विकृति झाली, त्याच्या कर्मात हानी झाली कीं उदरामध्ये वरच्यावर श्वास घेणे भाग पडते.

शुष्कताल्वोष्टशोष :- हे लक्षण वातज आहे. आणि ते प्राधान्याने वातज उदरव्याधींत आढळते. उदराच्या त्वंड मासा तर जलसंचिती झाल्या कारणांने इतर स्थानांत [ ताल्वोष्ट क्षय आढळून येतो. उदरांत उदकवह स्त्रोतोदुष्टीमुळे हे निर्माण होते. उदकवह स्त्रोतसाचे मूळ तालु आहे. अग्निदोष असता लाल कमी सुटते. [ पाचकाग्नीची विकृति ..... त्यामुळे परिणामी क्लेदक व बोधक कफाची दृष्टी होवून तालु - ओष्ट ही कोरडी पडतात.

तृष्णा :-[Thirst] उदराच्या विशेषत: जलोदर व्याधीमुध्ये अनेक रुग्णांत आढळून येणारे हे प्रमुख लक्षण आहे. सुश्रुतांनी "ससतं च विबेव्दारि न तृप्तिमापगच्छति

पुन: कांक्षति तोय च तृष्णार्दितमादिशेत अशी तृष्णातीची व्याख्या केली आहे.

तृष्णा संप्राप्तीत पित्त आणि वात आपापल्या प्रकोपक कारणांनी प्रकुपित होतात आणि ती सौम्य जलीय धातूंचा शोषण करतात. बलवान वात, पित्त, जिव्हा मूळ गल तालु क्लोमस्थित: उदक वाह स्रोतसाचा शोष करून तृष्णा उत्पन्न करतात.

पित्तानिलौ प्रवृध्दौ सौम्यान धातूंश्च शोषयत: ।
रसवाहिनीश्च धमनी जिव्हामूल गल तालु क्लोम्त: संशोष्य नृणा देहे
जनयेत तृष्णा महाबलावेतौ .... ।

उदरविकारांत रसक्षयज तृष्णा लक्षणरूपांत मिळते.

रसप्रदोषज विकारांत उदराची गणना करता येते. सु.स.अ.१५ मध्ये रसक्षयाच्या लक्षणांत तृष्णेचा उल्लेख केलेला आहे. रसक्षय, हृत्पीडा, कम्प शून्यता, तृष्णांच रस जलीय द्रव्य आहे. रस क्षीणता झाल्याने रुग्णाला तहान लागून त्याचा स्वर कमी होतो. हृदय,गल, तालू वगैरे भाग शुष्कहोतात. अर्थात वरीलप्रमाणे उदरांत स्त्रोतोरोध प्रति शेकडा १२ मध्ये वरील लक्षण दिसून आले.

कुक्षिशूल :- उदररुग्णांमध्ये प्रतिशेकडा २९ शूल हे लक्षण दिसून आले. शूल पार्श्वव्दय, बस्ति वगैरे ठिकाणी वैशिष्ठयाने होता. पुरिषांसग, वातमुत्र संग, वगैरेमुळेच शूल होता. हृदष्टिजन्य उदरांत प्राय: वातिक-शूल पहावयास मिळाला. यकृदाल्यवर जलोदरांत शूल जास्त प्रमाणांत होता. जलोदरांत अधिक जसंचिती लागल्यावर उपद्रवात्मक शूल ब-याच रुग्णांत आढळला.

शिर:शूल :- जलोदर झालेल्या प्रतिशत ३३ रुग्णांमध्ये शिर:शूल आढळून आला, तो तीव्र, भेद या स्वरूपाचा होता.

अर्श - - प्रतिशत ११ रुग्णांत अर्श, उदरामध्ये आढळून आला. विशेषत: वातार्श, व रक्तार्श होते. जरी अर्शाची निदानार्थकर म्हणून गणना केलेली आहे. तरी जलोदरांत लक्षण म्हणून ते आढळून येते.

अतिसार - - अतिसार लक्षण पित्तोदरांत विशेषत: पहावयास मिळाले. प्रतिशत १ ते २ बहुतेक रुग्णांत विबंधच होता [ परंतु पूर्वेतिहासांत अतिसार अधिक प्रमाणांत होता. प्रतिशत २० ] अग्निमांद्यज अतिसार व ग्रहणी हे विकार आहेत. आणि ग्रहणी उदराचा निदानार्थकर रोग म्हणून वर्णिलेली आहेच.

मूत्राल्पता - - सर्व रुग्णांत मूत्रप्रवृत्ति अल्पांशाने होती. प्रतिशत ७० व जलोदरी रुग्णांमध्ये पीतवर्ण आणि सांकायुक्त मूत्रप्रवृत्ती [ इतर उदरापेक्षा या उदरांत ] वैशिष्ट्याने पहावयास मिळाले जलोदरात उदकवह स्त्रोतस व मूत्रावह स्त्रोतसाची विकृति स्पष्ट आहेच.

रक्तस्त्राव :- जलोदराच्या प्रतिशत १६ रुग्णांमध्ये रक्तस्त्राव लक्षण मिळाले, कांही रुग्णांत ष्ठीवनाबरोबर रक्तप्रवृत्ति दिसून आली. कांही रुग्णांत नासागत रक्तस्त्रावही दिसून आला.

छर्दि - - जलोदराच्या १५ प्रतिशत रुग्णांमध्ये छर्दि हे लक्षण मिळाले, क्वचित रक्तछर्दिही दिसून आली. [ यकृदाल्युदरजन्य जलोदर ] ज्यांना दुधाचा मुक्तच दिकारा अशा जलोदरी रुग्णांना हे लक्षण दिसल्यावर दुधाव्यतिरिक्त इतर खाद्यपदार्थ देण्याची अडचण पडली. अशावेळी फळरस वगैरे देण्यात आला व छर्दि कमी झाली.

ज्वर - - उदर रुग्णांत पित्तप्राधान्य असतां ज्वर लक्षण म्हणून दिसून आला. ज्वर हा रसवह स्त्रोतसाचा व्याधि आहे. रुग्णांमध्ये ज्वर २० प्रतिशत आढळून आला.

आन्त्रवृध्दि - - जलोदराच्या ५ प्रतिशत रुग्णांमध्ये आंत्रवृध्दि हे लक्षण दिसून आले.

यकृत - प्लीहावृध्दि - प्लीहावृध्दीचे रुग्ण अधिक पहावयास मिळाले प्रतीशत ६३ प्लीहावृध्दि व प्रतिशत २५ यकृतवृध्दि जलोदरात लक्षण रुप म्हणून पहावयास मिळाली. यकृतदाल्युदरजन्य जलोदरांत कामलेची लक्षणे पहावयास मिळाली.

यकृत प्लीहा रक्तवह स्त्रोतोमूल असून रक्तप्रदोषज विकार म्हणून ... गुदमेद्रास्यपाकश्च प्लीहा .... असा उल्लेख सापडतो.

## जलोदर लक्षण समीक्षा [ अवस्था भेदेन ]

जलोदरामध्ये २ प्रकारच्या लक्षणांचे वर्णन केलेले आहे. कांही लक्षणे उदरामध्ये जलप्रादुर्भाव झालेली तर कांही दोषपरिचयदर्शक असतात. उदरामध्ये जलप्रादुर्भाव झालेली लक्षणे म्हणजेच उदराची प्रात्यात्मलिंगे होत. त्या वरूनच जलोदर असे निदान केले जाते. तसेचं ७ उदर रोग तथा अन्य रोगापेक्षा दकोदराचे भिन्नत्व दर्शविले जाते. खाली दकोदराच्या सर्व लक्षणांचे २ भागांत वर्गीकरण केले आहे.

| जातोदक लक्षण | | अन्यदोषपरिचायक लक्षणे | |
|---|---|---|---|
| १. उदकपूर्ण कदृतिवत संक्षोभ संस्पर्श | [च.] | १] नानावर्णसिरासंततम् | [च] |
| २. उदकपूर्ण दृतिवत कंपनम् | [सु.] | २] स्निग्धं उदरम | [सु.] |
| ३. अंबुपूर्ण दृतेरिव शब्द: | [सु.] | ३] दौर्बल्य | [च.] |
| ४. संपरिवृत्तनाभि उदरम | [सु.] | ४] गुदस्त्राव: | [च.] |
| ५. सिरांतधानिगमनम | [च.] | ५] कास: | [च.] |
| ६. भृशोन्नतं उदरम | [सु.] | [६.] श्वास | [च.] |
| ७. महत उदरम | [सु.] | [७.] उदरशूलम | [च.] |
| ८. कुक्षेरतिमात्रावृध्दि: | [च.] | ८] पिपासा | [च.] |
| | | ९] अन्नाकांक्षा | [च.] |

उपयुक्त लक्षणावरुन उदकपूर्णता परिचायक वर्गातील पहिली तीन लक्षणे उदरामध्ये जलप्रादुर्भाव झाल्यावर उदरपरिक्षणाने ज्ञात होतात. लक्षणांमध्ये योजलेल्या शब्दद्वारा मूर्त दृष्टांत देऊन उदाहरणाद्वारा जातोदकतेचे स्वरुप स्पष्ट केले आहे, भिस्त्याची पखाल पाण्याने पूर्ण भरुन ती अंगुली स्पर्शाने पाहिली गेली, नंतर जे जे भाव प्रकट झाले

ते ते शब्दद्वाराच मूर्त केले गेले. त्या भावाची उदरामध्ये उपलब्धता दिसल्यावर जलप्रादुर्भाव मानला गेला.

स्वस्थ व्यक्तिमध्यें प्राय: नाभि गर्त असते. उदरत्वचेखाली द्रव्यसंचय झाल्याकारणाने ती वर वा पुढच्या बाजूला उचलली जाते. त्यावरुन त्वचा ताणली जाते व एक मर्यादेवर नाभिगर्त समाप्त होऊन उदरांतील स्तराला मिळतो. यालाच संपरिवृत्तनाभि वा परिवृत्त नाभि -- उद्वृत्त नाभि म्हणतात. याचे कारण उदरातील अधिक द्रवता हेंच नसून नाभित्वचेची मृदुता नाभिगर्तावरील द्रवांचे आधिक्य असते [ यामध्ये टोपी उलटल्यावर अशी स्थिती होते तशी नाभिची स्थिती होते.

शरीरांत सर्वत्र नीलवर्ण रक्तवह सिरांचे जाळे बहुधा दिसुन येतें. स्वस्थ मनुष्याच्या उदरावरही न्याहाळून पाहिले असता अशाच तऱ्हेचे सिराजाल दिसतें. उदरामध्ये त्वचेच्या खाली जेंव्हा द्रवसंचयास सुरवात होते. तेव्हा उत्सेधाबरोबरच सिरापूर्णत्व दिसते. परंतु नंतर अधिक द्रव्यसंचयास सुरवात होते. तेव्हा झाल्यावर दाबाने उदरावरील त्वचेमध्ये या सिरांत रक्त येणे बंद होते व सिरा दिसणे बंद होते. या प्रमाणे चरकोक्त नानावर्णराजिसिरासंतता एवं सिरान्तर्धानिमग्न" ही दोन्ही लक्षणे पूर्वापार कालापासून दकोदरांत मिळण्याची कल्पना उचित आहे. म्हणून या दोन लक्षणांचे अस्तित्व एकाच जलोदरांत कालभेदाने असणें शक्य आहे. क्रियात्मक दृष्टीने सिरासंतत अवस्था यकृतवृध्दि असतां अधिक मिळते. प्रतिशत २३ रुग्ण [

कुक्षरतिमात्रावृध्दि :- मृशोन्नतउदरम - - महदुदर ही तीन लक्षणे शास्त्रात भिन्न वर्णिली असली तरी वस्तुत: एकच भाव व्यक्त करतात.

उदर रोगात उदरोत्सेधाच अनिवार्य आहे. परंतु दकोदरामध्ये अल्प उदरोत्सेधा अधिक उदरोत्सेधा असतो असें वैशिष्ट्याने सांगितलेले आहे.

स्निग्धा उदरम हे लक्षाण कफाधिक्यदर्शक आहे. स्निग्धा हा कफाचा गुण आहे. तसेंच दकोदरांत कफदोष प्रधान असतो...

मारूत: क्लोम्नि संस्थित:
स्त्रोतस्सु रुध्दमार्गेषु कफश्चोदकमूच्छित:
च. चि.१३/४५-४६

कफ ज्या दोन महाभूतांपासून बनतो. त्यामध्ये जल प्रधान आहे [जल + पृथ्वी ] म्हणून याला जलीय द्रव्य मानले आहे.यामुळे दकोदरामध्ये याचे आधिक्य होणे स्वाभाविक आहे.

गुदस्त्राव :- हे लक्षाण चरकाने दकोदरांत सांगितले आहे, तसेंच पित्तोदरांच्या लक्षाणांत अतिसार सांगितला आहे. पित्तदोषप्रधान अवस्थामध्ये अन्य ठिकाणीही अतिसरण हे लक्षाण आढळते, दकोदरांत पित्तदोषाधिक्याच्या अवस्थेत हे लक्षाण मिळते. प्रत्यक्षात काही रुग्णांत हे पहावयास मिळाले.

पिपासा, दकोदराच्या संप्राप्तीमध्ये उदकवह स्त्रोतसांची विकृति फार महत्वाची मानली आहे आणि उदकवहस्त्रोतोदृष्टीजन्य पिपासा हे लक्षाण आहे.

कास तथा श्वास प्राणवह स्त्रोतसाची दृष्टी तथा वातश्लेष्मदोष दृष्टीने निर्माण होतात. "अतिसृष्ट अतिबध्द कपितमल्पाल्पं अभीक्ष्णं वा सशब्दशूल उच्छ्वसंत दृष्टवा प्राणवहान्यस्य स्रोतांसि प्रदुष्टानीती विद्यात च. वि. ५/८

बफवातात्मकावेतो ..... च. चि. १७/८

उदर रोगाच्या संप्राप्तिमध्येकफ वा वात दोष तथा वरील खालीतसे दुष्ट होत असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

उदरशूल वातदोषांचे लक्षण आहे. अपानदृष्टीमुळे वातमूत्र तथा पुरषाची यथोचित प्रवृत्ती न झाल्याने उदरांत सदोष मलसंचय होऊन हे लक्षण उत्पन्न होते.

अन्नकांक्षा -- हे अग्निमांद्याने वातदोषप्राधान्याने लक्षण आहे.
दौर्बल्य - - अग्निमांद्यामुळे धातुनिर्मितीत न्यूनता - - धातुक्षयजन्य लक्षण आहे.

चरकाने दकोदर संप्राप्तिप्रकरणांत उदकप्रादुर्भावापूर्वी पिच्छोत्पत्ति वर्णन करताना त्या अवस्थेतील खालीलप्रमाणे लक्षणे लिहीलेली आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | मण्डल उदरम | ५] | मृदुस्पर्शं उदरम |
| २] | गुरु उदरम | ६] | अपगतराजिकं उदरम |
| ३] | स्तिमित उदरम | ७] | आक्रांते नाभ्यां एवं उपसर्पणं उदरस्य |
| ४] | आकोठिंत अशब्द उदरम् | | |

तत्र पिच्छोत्पत्तौ मण्डल उदरं गुरं स्तिमित आकोठितशब्दं मृदुस्पर्शं अपगतराजिकं आक्रान्तं नाभ्या एवं उपसर्पति - - ततो नन्तरं उदकप्रादुर्भाव:

या पिच्छोत्पत्ति लक्षणामध्ये अपगतराजीकं लक्षण विचारणीय आहे. दकोदरांतील सिरांतर्धानगमनापेक्षा हे भिन्न नाही. ही दोन्ही समान भाव व्यक्त करणारी लक्षणे भिन्न भिन्न अवस्थांमध्ये कशी निर्माण होतात ? यासाठी अधिक रोगी परीक्षणानंतरच समाधान होईल.

चरकांनी अजातोदकतेची लक्षणे भिन्न वर्णिली आहेत. यावरुन उदरांत जल आहे किंवा नाही. या बदलचे ज्ञान प्राप्त होते.

अशोथमुदरम्, अरुण , नातिभारिकं, सिराजालगवाक्षितं गुडगुडायनम नाभिविष्टम्भ अन्नविष्टंभ, पुरिषवातयोः वेगं कृत्वा मरुतस्य प्रशमनम नाभिवेदना, उदरे सशब्द वायोः संचरम कर्कश वात-सृजनम हृदयवेदना, कटि वेदना, वंक्षणवेदना, पायुवेदना, बध्दविट्कत्वम नातिमंदानलता, लौल्यम आस्यवैरस्यम, मूत्राल्पता. च.चि.१३/५५-५८

उपयुक्त लक्षणांत अधिक लक्षणे वातदोष परिचायक आहेत. ही लक्षणे जातोदकतेपूर्वी वातदोष प्रधान असल्याचे दर्शवितात.

## उदर रोग रुपे

| प्रात्यात्मिक लक्षणे | सामान्य लक्षणे | सामान्य लक्षणे |
|---|---|---|
| १. प्रनष्टाग्नि [पुरुष] | १. अग्निमांद्य | १४. तालुशोष |
| २. प्रनष्टबल " | २. कार्श्य | १५. श्लक्ष्णगंडत्व |
| ३. प्रनष्ट आहार " | ३. तंद्रा | १६. कुक्षीरोध्मान |
| ४. सर्वचेष्टास्वनीश्वर " | ४. अंगसाद | १७. आटोप |
| ५. दीन: " | ५. अ] मलसंग | १८. करशोफ |
| ६. कृशगात्र " | ५. ब] मूत्रसंग | १९. पादशोफ |
| ७. शुष्कवस्त्र " | ६. दाह | |
| ८. शुष्कतालु " | ७. चेष्टानाश | |
| ९. आध्मातोदर " | ८. दौर्बल्य | |
| १०. आध्मातकुक्षि " | ९. नष्टाहारत्व | |
| ११. शुष्ककोष्ठ " | १०. गमने शक्ति | |
| १२. शूनोदर " | ११. शोफ | |
| १३. शूनकर " | १२. तृष्णा | |
| १४. शूनपाद " | १३. ओष्ठशोष | |

## उदर - स्वसंवेद्य व परसंवेद्य लक्षणे.

| स्वसंवेद्य लक्षणे | परसंवेद्य लक्षणे |
|---|---|
| **वातोदर :-** | |
| १] शूल - कुक्षि, पार्श्व, उदर, कटि, पृष्ठ | १. श्वयथु -कुक्षी, पाणी पाद वृषण. |
| २] पर्वभेद | २. अनियत वृध्दि - ह्रास, उदर |

३] अरोचक

४] अविपाक

५] अंगमर्द

६] अधोगुरुत्व

७] दौर्बल्य

८] उदावर्त ]
९] तोद ] वेदना विशेष
१०] भेद ]

११] काम

१२] श्वास

१३] वातमूत्र पुरीष संग.

३. वर्ण - श्वायारुणत्व - नख
नयन, वदन, त्वक, मूत्र, मल

४. उदरराजी - असित

५. उदर सिरासंतत

६. स्पर्श आध्मान

७. स्पर्श आहुत अध्मात दृतिवत शब्द:

पित्तोदर :-

| स्वसंवेद्य लक्षणे | परसंवेद्य लक्षणे |
| --- | --- |
| १] दाह | १] ज्वर |
| २] तृष्णा | २] मूर्च्छा |
| ३] भ्रम | ३] वर्ण - हरिद्रता - |
| ४] कटुकास्यता | नख, नयन, वदन, |
| ५] अतिसार [मल] | त्वक, मूत्र, मल, |
| ६] वेदना विशेष [उदर] | ४] सिराराजी वर्ण -- |
| दह्यते | नील, पीत, हारिद्र |
| द्रयते | हरित, ताम्र. |
| धूप्यते | ५] स्पर्श - मृदू स्पर्शदिरता. |

| | |
|---|---|
| उध्मायते | ६] क्षिप्रपांक उदरं [अचिरात वृध्दि ] |
| स्विद्यते | |
| क्लिश्यते. | |

कफोदर :-

| | |
|---|---|
| १] गौरव | १] शोफ |
| २] अरोचक | पाणि, पाद, मुष्क, उरु |
| ३] अविपाक | २] वर्णशुक्लता - - |
| ४] अंगमर्द | नख, नयन, वदन, त्वक, |
| ५] सुप्ति | मूत्र, मल. |
| ६] उत्क्लेश | |
| ७] निद्रा | ३] उदर स्निग्धता |
| ८] उदर गुरुत्व | ४] उदर श्लक्ष्णता |
| ९] उदर स्तैमित्य | ५] उदर काठिण्य [स्थैर्य] |
| १०] अंगसाद | ६] शीतस्पर्श |
| | ७] उदरचिराभिवृध्दि |

दुष्योदर - -

| | |
|---|---|
| १] उदरदाह | १. नखादींमध्ये सर्व वर्ण |
| २] भ्रम | २. उदर - नानावर्ण राजी सिरातत |
| ३] तृष्णा | ३. पाण्डुता |
| ४] शोष | ४. कार्श्य |
| | ५. शीघ्रपाक |
| | ६. इतर वातादींप्रमाणे लक्षणे |

प्लीहोदर - -

| | |
|---|---|
| १] दौर्बल्य | १. कार्श्य |
| २] अरोचक " आस्यवैरस्य | २. वर्ण |

३] अविपाक
४] वर्चोग्रह
५] मूत्राग्रह
६] तमप्रवेश
७] मूर्च्छा
८] पिपासा
९] अंगमर्द
१०] छर्दि
११] अंगसाद
१२] आनाह
१३] अग्निनाश
१४] पर्वभेद
१५] कोष्ठशूल.

अरुणाभं
विवर्ण
नील,
हरित, राजीमत
हारिद्र
३. स्पर्श
अ. वामपार्श्वस्थ प्लीहावृध्द
ब. दक्षिणापार्श्वस्थ यकृतवृध्द

<u>बध्दगुदोदर</u> :-

१] तृष्णा
२] दाह
३] ज्वर
४] मुखतालुशोष
५] उरूसाद
६] श्वास
७] कास
८] दौर्बल्य
९] अरोचक
१०] अविपाक

१] हृदय व नाभि यांच्यामध्ये उदरोत्सेध
२] उदर - - अरुण नीलराजी सिरावनध्द आराजिंकं वा.

११] वर्चोमूत्राग्रह
१२] आध्मान
१३] छर्दि
१४] क्षवथु
१५] शिरोहृन्नाभिगुदशूल

[ ... क्षतोदर ]

क्षतोदर :-

| | |
|---|---|
| १] हिक्का | १. अधोनाभि वृद्धि |
| २] कास | २. मलप्रवृत्ति - - |
| ३] श्वास | सलोहित |
| ४] तृष्णा | पीत |
| ५] अरोचक | नील |
| ६] अविपाक | पिच्छिल |
| ७] दौर्बल्य | कुणपगंधी |
| ८] उदरतोद | कुक्षर आम |
| ९] उदरविदाह | सलिल प्रकाश स्त्राव |
| १०] भ्रम | |

जलोदर :-

| | |
|---|---|
| १] अनन्नाकांक्षा | १] उदर - नाना वर्णसिरासंतत राजि. |
| २] अरुचि | |
| ३] पिपासा | २] उदकपूर्ण दृति क्षोभ |
| ४] शूल | ३] उदकपूर्ण दृति स्पर्श |
| ५] कास | ४] कुक्षे: अतिमात्रावृद्धि |

६] श्वास

७] दौर्बल्य

५] सिरान्तर्धानिगमनम

६] उदकपूर्ण दृति शब्द

७] उदकपूर्ण दृति कंपन

८] उदर महान

९] उदर स्निग्धा

१०] उदर स्थिर

११] आवृतत्तनाभि [ परिवृत्त नाभि ]

१२] नाभ्या स्पृष्टं हि सर्पति.

पंचज्ञानेंद्रियग्राह्यादि - अष्टौ

| पंचज्ञानेंद्रिये | विषय | वातोदर | पित्तोदर | कफोदर |
|---|---|---|---|---|
| दर्शन | रूप | वर्ण - श्यावारुणत्व | वर्ण-हारिद्र | वर्ण - शुक्लता |
| | | नख | नख | नख |
| | | नयन | नयन | नयन |
| | | वदन | वदन | वदन |
| | | त्वक् | त्वक | त्वक् |
| | | श्वयथु -- | सिराराजी -- | शोफ - |
| | | कुक्षि, पाणि, | नील | पाणि |
| | | पादि, वृषण | पीत | पाद |
| | | असित उदरराजी | हरित | मुष्क |
| | | | हारिद्र | उरु |
| | | | ताम्र | उदर - स्निग्धता |
| | | | | श्लक्ष्णता |
| स्पर्शन | स्पर्श | आध्मान | ज्वर | उदरकाठिण्य |
| | | | मृदुस्पर्शादिरता | शीतस्पर्श |
| | | | उदर-स्वेद-क्लेद | उदरस्तैमित्य |
| श्रवण | शब्द | कास-श्वास | | |
| | | आध्मवत दृतिवत् शब्द | -- | -- |
| रसना | रस | -- | -- | -- |
| घ्राण | गन्ध | -- | -- | -- |
| प्रश्नेन | वेदना विशेष | अरोचक | कटुकास्यता | अरोचक |
| | | शूल -- | दाह | गौरव |
| | | कुक्षि, पार्श्व, | तृष्णा | अंगमर्द |
| | | उदर, कटि, पृष्ठ | भ्रम, | सुप्ति |
| | | पर्वभेद, अंगमर्द, | उदर -दह्यते, | उत्क्लेश |
| | | अधोगुरुत्व, दौर्बल्य | दूयते, धूप्यते. | निद्रा |
| | | उदावर्त, तोद, भेद | ऊष्मायते | उदरगुरुत्व, अंगसाद |
| मलमूत्र स्वरूप | वातमूत्रपुरीषासंग | | अतिसार | -- |
| वर्ण. | श्याव, अरुण | | हरित् | शुक्ल |
| कालदृष्ट्या | | अनियत वृध्दिह्रासं | क्षिप्रपाक | चिराभिवर्ध्द |

उदराणि -- व्यवच्छेदक लक्षणें.

| दूष्योदर | प्लीहयकृतोदर | बध्दगुदोदर | क्षतोदर | दकोदर |
|---|---|---|---|---|
| सर्ववर्ण --<br>नख,<br>नयन,<br>वदन,<br>त्वक्<br>पाण्डुता<br>कार्श्य<br>उदर-नाना<br>वर्णराजी -<br>सिरासंतत | वर्ण - अरुणाभ,<br>विवर्ण<br>नील ]<br>हरित ] राजीमत्<br>हारिद्र ]<br>कार्श्य | नाभ्यां उपरि<br>गोपुच्छवत्<br>उदरम् | अधोनाभि वृध्दि | नानावर्णराजी-<br>सिरासंतत उदरम्<br>कुक्षेः अतिमात्रवृध्दि<br>सिरांतर्धानगमन<br>उदर - महत्<br>स्निग्ध<br>स्थिर<br>परिवृत्त नाभि |
| -- | वामपार्श्वस्थित-<br>प्लीहावृध्दी<br>दक्षिणपार्श्वस्थ<br>यकृतवृध्दि | हृदयनाभिमध्यें<br>उदरोत्सेध<br>ज्वर<br>आध्मान | अधोनाभिवृध्दि<br>आध्मान | उदकपूर्णदृति स्प<br>-- कंपन<br>नाभ्यां स्पृष्ट<br>हि सर्पति |
| -- | -- | कास-श्वास | हिक्का, कास,<br>श्वास. | उदकपूर्णदृति शब्द |
| -- | -- | -- | -- | -- |
| -- | -- | -- | कुणपगंधी मलप्र. | -- |
| उदरदाह<br>भ्रम<br>तृष्णा<br>शोष | अरोचक आस्यवै.<br>दौर्बल्य<br>अविपाक<br>तमप्रवेश, मूर्च्छा<br>पिपासा, अंगमर्द,<br>छर्दि, अंगसाद,<br>आनाह, अग्निनाश<br>पर्वभेद, कोष्ठशूल | अरोचक<br>तृष्णा, दाह,<br>मुखतालुशोष<br>उत्साद, दौर्बल्य,<br>अविपाक, छर्दि<br>क्षवथु,<br>शिरोहन्नाभि-<br>गुदशूल | अरोचक<br>तृष्णा<br>अविपाक<br>दौर्बल्य<br>उदरतोद<br>उदरविदाह<br>भ्रम | पिपासा<br>शूल<br>दौर्बल्य<br>अरुची<br>अनन्नाकांक्षा |
| -- | वर्चोग्रह, मूत्राग्रह | वर्चोमूत्र संग | [मल] सलोहित,<br>पीत, नील, पिच्छिल,<br>आम, सलील प्रकाशं स्राव. | गुदस्राव |
| --- | --- | आशुकारी | आशुकारी | ------- |